09 FEB 2026 जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक राष्ट्रनिर्मितीचे शिल्पकार व्हावेत : हाके

**● जयसिंगपूर कॉलेजच्या धरणगुत्ती येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराची सांगता**

**जनप्रवास : जयसिंगपूर**

राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ सामाजिक उपक्रमांची चळवळ नसून विद्यार्थ्यांना जबाबदार, सजग व राष्ट्रहितासाठी कार्य करणारे नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक सत्यवान हाके यांनी केले.

जयसिंगपूर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष संस्कार शिबिर धरणगुत्ती (ता. शिरोळ) येथे झाले. शिबिराच्या सांगता समारंभात पोलीस निरीक्षक हाके बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरत मांजरे होते. ते पुढे म्हणाले, युवकांची राष्ट्रविकासातील भूमिका स्पष्ट करत सामाजिक शिस्त, कायदा व सुव्यवस्थेचे पालन, व्यसनमुक्ती, स्वच्छता आणि




**धरणगुत्ती : येथे जयसिंगपूर कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिराच्या सांगता समारंभात बोलताना पोलीस निरीक्षक सत्यवान हाके.**

नागरिकांचे कर्तव्य याविषयी मार्गदर्शन केले. तसेच आपल्या करिअरचा अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडून प्रेरणादायी विचार व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. मांजरे यांनी आपले विचार व्यक्त केले.

या शिबिरासाठी संचालक तानाजी चौगले, सरपंच विजया कांबळे, शेखर पाटील, सर्व सदस्य व ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत केंबळे यांचे सहकार्य लाभले. प्रा. प्रभाकर माने यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. गणेश कुरले यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रणाली गुरव व कोमल वरक यांनी केले. आभार खंडेराव खळदकर यांनी मानले.

0 9 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चित्रपट निर्मितीचा ध्यास बाळगा

## • रणजित जाधव : चित्रपट महामंडळाला शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची भेट

**जनप्रवास : कोल्हापूर**

चित्रपट निर्मिता होऊन चित्रपट निर्मितीचा ध्यास बाळगा, असा आशावाद संचालक रणजित जाधव यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंग विभागातील विद्यार्थ्यांनी येथील अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ कार्यालयाला भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, चित्रपट निर्मिती करा पण त्यासाठी निर्मिती प्रक्रियेतील प्रत्येक घटकाचा अभ्यास करा. त्याची माहिती घ्या आणि कलात्मक अशी निर्मिती करा. संचालक व कला दिग्दर्शक सतीश बिडकर यांनीही बहुमोल असे मार्गदर्शन केले. ते म्हणाले, चित्रपटसृष्टीत आता आमची तिसरी पिढी आहे. यशाचे शिखर गाठायचे आहे तर झोकून देऊन काम करा. यश आपलेच आहे. व्यवस्थापक रवींद्र बोरगावकर यांनी स्वागत केले. त्यांनी चित्रपट निर्मितीतील आव्हाने, सध्याच्या मराठी चित्रपटसृष्टीची परिस्थिती आणि भविष्यातील संधी यावर भाष्य केले. फिल्म मेकिंगचे सहयोगी शिक्षक बाबासाहेब खाडे यांनी प्रास्ताविक केले. अनुप जत्राटकर यांनी आभार मानले.

यावेळी नम्रता गोडबोले, सिद्धेश मंगेशकर, मास कम्युनिकेशन, फिल्म मेकिंगचे विद्यार्थी होते. सामंजस्य करार करू चित्रपट महामंडळ, चित्रनगरी व शिवाजी विद्यापीठामध्ये लवकरच सामंजस्य करार करून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबर चित्रीकरणाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना माहिती होण्यासाठी लवकरच शासन, पदाधिकाऱ्यांच्या माध्यामातून प्रयत्न करू, असे आश्वासनही जाधव व बिडकर यांनी यावेळी दिले.

0 9 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# क्रीडा क्षेत्रात महत्त्वाकांक्षा असेल तर यशाला गवसणी : डॉ. ढमकले

**मुरगूड : प्रतिनिधी**

शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही सातत्य, परिश्रम व महत्त्वाकांक्षा असेल तर यशाला गवसणी घालता येते. विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून करिअर तर करता येतेच, शिवाय त्यांचे शरीरही निरोगी व मजबूत होण्यास मदत होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी केले.

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे होते. यावेळी व्हॉलीबॉल प्रशिक्षक महादेव कानकेकर, आंतरराष्ट्रीय कुस्ती मार्गदर्शक दादा लवटे, व्हॉलीबॉल मार्गदर्शक संभाजी मांगले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गुणवंत खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते शूज व टी-शर्ट देऊन गौरविण्यात आले.



**मुरगूड : खेळाडूंना शूज व टी-शर्ट प्रदान करताना डॉ. रघुनाथ ढमकले, स्वागत परुळेकर, रणजित नलवडे, डॉ. शिवाजी होडगे, डॉ. शिवाजी पोवार, महादेव कानकेकर, दादा लवटे व अन्य.**

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य स्वागत परुळेकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात मनःपूर्वक काम केले तर त्या क्षेत्रात त्यांना सर्वोच्च कामगिरी करता येते. यावेळी राष्ट्रकुल कुस्ती स्पर्धा सुवर्णपदक विजेता व शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित पैलवान रणजित नलवडे, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास जे. के. कुंभार, श्रावण कळांद्रे आदी उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य व जिमखाना चेअरमन प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. डॉ. पांडुरंग फराकटे यांनी करून दिली. वार्षिक अहवाल वाचन प्रा. दादा सरदेसाई यांनी केले. आभार प्रा. राम पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे यांनी केले.

0 9 FEB 2026
सकाळ



अर्जुननगर : येथील देवचंद महाविद्यालयामध्ये आयोजित मराठी भाषा पंधरवडा कार्यक्रमात कोणतेही पुस्तक पाच रुपयात घेताना विद्यार्थ्यांची झालेली गर्दी.

# देवचंद महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

नानीबाई चिखली : विद्यार्थ्यांनी ग्रंथ वाचनाचा आनंद घेतला पाहिजे. ग्रंथ वाचनातून व्यक्तिमत्त्व विकास घडतो व नवनिर्मितीस चालना मिळते. ग्रंथ वाचून अनेकांचे आयुष्य बदलले आहे. त्यामुळे ग्रंथ हेच गुरू असे मानून वाटचाल केल्यास निश्चितच यश मिळत असल्याचे प्रतिपादन प्राचार्या डॉ. ज़ी. डी. इंगळे यांनी केले. अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयामध्ये मराठी विभागामार्फत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. यावेळी उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी कोणतेही पुस्तक केवळ पाच रुपयांमध्ये विद्यार्थ्यांना दिले. विद्यार्थ्यांनी प्रचंड गर्दी स्टॉलवर केली. तसेच विद्यार्थ्यांसाठी आयोजित सेट-नेट कार्यशाळेत किरण खोत, उत्तम कमते यांनी मार्गदर्शन केले. सानिका पाटीलने भावगीत आणि भक्तीगीत कार्यक्रमात गीत गायले. संस्थाध्यक्ष आशिष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह यांचे मार्गदर्शन लाभले. उपक्रमाचे आयोजन डॉ. रमेश साळुंखे, डॉ. आशालता खोत, प्रा. कृष्णामाई कुंभार, प्रा. प्रकाश पाटील, प्रा. विष्णू पाटील, प्रा. शिवाजी कुंभार यांनी केले.

0 9 FEB 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक शांततेचा शेवटचा धागा तुटला

# 'न्यू स्टार्ट' करार इतिहासजमा

**जागतिक इतिहासात ५ फेब्रुवारी २०२६ हा दिवस काळ्या अक्षरांनी लिहिला जाईल. जागतिक महासत्तांना अण्वस्त्रांच्या वापरावर आणि निर्मितीवर लगाम घालणारा शेवटचा कायदेशीर अडसर, ज्याला आपण 'न्यू स्टार्ट' करार म्हणून ओळखतो, तो ५ फेब्रुवारी रोजी अधिकृतपणे संपुष्टात आला. गेल्या पाच दशकांत हे पहिल्यांदाच घडत आहे की, जगातील दोन सर्वात मोठ्या अण्वस्त्रधारी महासत्तांवर अमेरिका आणि रशियावर त्यांच्या संहारक शस्त्रांची संख्या मर्यादित ठेवण्याचे कोणतेही कायदेशीर बंधन उरलेले नाही. यामुळे जग पुन्हा एकदा एका अनियंत्रित आणि भयानक 'शस्त्रस्पर्धे'च्या उंबरठ्यावर उभे राहिले आहे.**

-प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे,
भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अणुबॉम्बचे जनक रॉबर्ट ओपनहायमर यांनी शीतयुद्धाच्या काळात एक अतिशय मार्मिक उदाहरण दिले होते. ते म्हणाले होते की, अमेरिका आणि रशिया हे एका बाटलीत बंद असलेल्या दोन विंचवांसारखे आहेत, जे एकमेकांना डंख मारू शकतात पण स्वत:ही मरू शकतात. आजच्या परिस्थितीकडे पाहता, ती बाटलीच फुटली आहे आणि आता या जीवघेण्या खेळात चीनच्या रूपाने तिसरा विंचूही सामील झाला आहे. ही परिस्थिती १९६२ च्या क्युबन मिसाईल क्रायसिसपेक्षाही अधिक गुंतागुंतीची आणि धोकादायक बनली आहे, कारण आता नियंत्रणाची कोणतीही चौकट अस्तित्वात नाही.

या कराराचा इतिहास पाहिला तर त्याचे महत्त्व समजते. १९६२ मध्ये जग तिसऱ्या महायुद्धाच्या अगदी जवळ पोहोचले होते. त्यातून धडा घेत १९६८ मध्ये 'एनपीटी' आणि पुढे १९९१ मध्ये 'स्टार्ट १' करार अस्तित्वात आले, ज्यामुळे हजारोंच्या संख्येने असलेली अण्वस्त्रे कमी करण्यात यश आले होते. बराक ओबामा आणि दिमित्री मेदवेदेव यांनी २०१० मध्ये 'न्यू स्टार्ट' करारावर स्वाक्षऱ्या केल्या, ज्यानुसार दोन्ही देशांना प्रत्येकी १,५५० तैनात अण्वस्त्रांची मर्यादा निश्चित करण्यात आली होती. मात्र, युक्रेन युद्धानंतर रशियाने या कराराच्या तपासणी प्रक्रियेतून माघार घेतली आणि परिस्थिती बिघडत गेली. अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला या करारात सामील केल्याशिवाय रशियासोबतचा करार निरर्थक आहे, अशी स्पष्ट भूमिका घेतल्याने नूतनीकरणाची शक्यता मावळली होती, आणि अखेर काल हा करार संपुष्टात आला.




- रशिया-अमेरिका अण्वस्त्र स्पर्धेचा भडका;
- ५० वर्षांनंतर जग पुन्हा एकदा अण्वस्त्रांच्या दहशतीखाली

**खरे आव्हान चायनाचे**

'न्यू स्टार्ट' करार संपण्यामागे रशियाचे युक्रेनमधील युद्ध हे एक कारण असले तरी, अमेरिकेच्या चिंतेचे मुख्य कारण आता मॉस्को नसून बीजिंग आहे. पेंटागनने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, शी जिनपिंग यांच्या आक्रमक नेतृत्वाखाली चीनने आपली अण्वस्त्र क्षमता भयानक वेगाने वाढवली आहे. २०१२ मध्ये चीनकडे जेमतेम २४० वॉरहेड्स होते, ती संख्या आता ६०० च्या घरात पोहोचली आहे. इतकेच नव्हे तर, २०३० पर्यंत ही संख्या १,००० च्या वर जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. चीनने नुकतीच ११,००० किलोमीटर अंतरापर्यंत मारा करणाऱ्या आंतरखंडीय क्षेपणास्त्राची चाचणी करून पाश्चिमात्य जगाला उघड आव्हान दिले आहे.

ट्रम्प प्रशासनाचे म्हणणे आहे की, रशियासोबत करार करून अमेरिकेचे हात बांधले गेले आहेत, तर दुसरीकडे चीन मुक्तपणे आपली शस्त्रसाठा वाढवत आहे. आता करार संपल्यामुळे, ही बंधने दूर झाली आहेत. याचा परिणाम म्हणून रशिया आपली 'अवांगार्ड' (Avangard) सारखी ध्वनीच्या वेगापेक्षा कित्येक पटीने वेगवान असणारी हायपरसोनिक क्षेपणास्त्रे तैनात करण्यास मोकळा झाला आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिका आपली 'गोल्डन डोम' ही अत्यंत प्रगत संरक्षण यंत्रणा आणि नवीन पिढीची अण्वस्त्रे कोणत्याही आंतरराष्ट्रीय तपासणीशिवाय तैनात करू शकते. या परिस्थितीतून आंतरराष्ट्रीय राजकारणात ज्याला 'सिक्युरिटी डिलेमा' म्हणतात, तो पेच निर्माण झाला आहे. म्हणजे एका देशाने स्वत:च्या संरक्षणासाठी शस्त्रे वाढवली की दुसरा देश भीतीपोटी त्यापेक्षा जास्त शस्त्रे बनवतो. याचे लोण केवळ अमेरिका—रशिया—चीनपुरते मर्यादित राहणार नाही. आशिया खंडात चीनच्या या वाढत्या ताकदीमुळे भारत आणि पर्यायाने पाकिस्तानवरही आपला अणुसाठा वाढवण्याचा दबाव येईल. दक्षिण आशियातील सामरिक संतुलन यामुळे बिघडू शकते, असे मत संरक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. आता जगाला अशा एका शर्यतीला सामोरे जावे लागेल जिचा कोणताही शेवट दिसत नाही आणि ज्याचा परिणाम विनाशातच होऊ शकतो.

0 9 FEB 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेणूताईंच्या विचारांचा वारसा पुढे न्यावा

## डॉ. भारती पाटील : शिवाजी विद्यापीठात जन्मशताब्दी वर्षानिमित्त व्याख्यान

कोल्हापूर, ता. ८ : 'वेणूताई चव्हाण यांच्या कार्यात केवळ सेवा नव्हे, तर परिवर्तनाची स्पष्ट दिशा होती. आजच्या पिढीने वेणूताईंच्या व्यक्तिमत्त्वाचे हे पैलू लक्षात घेऊन त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे', असे प्रतिपादन प्रा. डॉ. भारती पाटील यांनी केले.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पत्नी वेणूताई चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे वेणूताई चव्हाण यांच्या कार्याची ओळख करून देण्यासाठी घेतलेल्या विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. नितीन माळी होते. डॉ. पाटील यांनी



**शिवाजी विद्यापीठ** : यशवंतराव चव्हाण अध्यासनाने घेतलेल्या विशेष व्याख्यानप्रसंगी उद्‌घाटन करताना डॉ. नितीन माळी. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. गजानन साळुंखे, डॉ. भारती पाटील, उमेश गडेकर, उर्मिला दशवंत उपस्थित होत्या.

वेणूताई चव्हाण यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकला. त्या म्हणाल्या, 'वेणूताई चव्हाण यांच्याकडे केवळ यशवंतराव चव्हाण यांची सावली म्हणून पाहिले जाते. तथापि, त्यांचे स्वतःचे म्हणून असे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा संघर्ष, धैर्य आणि सामाजिक योगदानाप्रती त्यांच्या मनात असलेल्या जाणिवा या सर्वच बाबी त्यांचे वेगळेपण दाखविणाऱ्या होत्या. वेणूताई चव्हाण यांनी आपल्या कार्यातून स्त्रीला स्वावलंबी, आत्मविश्वासी आणि विचारक्षम बनवण्याचा ध्यास घेतला होता. सामाजिक सेवेपलीकडे एक परिवर्तनाची स्पष्ट दिशा त्यांच्या समग्र कार्याला लाभलेली होती.'

डॉ. माळी म्हणाले, 'वेणूताई चव्हाण यांनी ज्या तन्मयतेने यशवंतराव चव्हाण यांना अखंड साथसोबत केली, तिला तोड नाही. आजच्या पिढीसाठी ते अत्यंत आदर्शवत आणि प्रेरणादायी आहे.' डॉ. गजानन साळुंखे यांनी स्वागत केले. डॉ. प्रताप खोत यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. उमेश गडेकर, चेतन गळगे, संतोष सुतार, मृणालिनी जगताप, उर्मिला दशवंत आदी उपस्थित होते.

0 9 FEB 2026

जनप्रवास

# राजर्षी शाहू संगीत रजनी १० फेब्रुवारीपासून

## ● पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहामध्ये आयोजन

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित करण्यात येणारी राजर्षी शाहू संगीत रजनी यंदा येत्या १० व ११ फेब्रुवारीरोजी पेटाळा (कोल्हापूर) येथील राम गणेश गडकरी सभागृहामध्ये होत आहे. २८ जानेवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाल्यामुळे २९ व ३० जानेवारी रोजी आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनी स्थगित करण्यात आली होती. ही दोन दिवसीय संगीत रजनी दररोज संध्याकाळी ५:३० वाजता सुरू होईल. संगीत रजनीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा.डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार असून या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाच्या प्र–कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

संगीत रजनीमध्ये पहिल्या दिवशी पहिल्या सत्रामध्ये सौ. मौशमी जाजू, पुणे यांचे कथ्थक नृत्य होणार आहे, तर दुसऱ्या सत्रामध्ये अतुल खांडेकर,पुणे यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात डॉ. सुधांशु कुलकर्णी व सारंग कुलकर्णी, बेळगाव यांच्या हार्मोनियम (संवादिनी) वादनाची जुगलबंदी होणार आहे. तर, दुसऱ्या सत्रामध्ये पं. विजय कोपरकर, पुणे यांच्या शास्त्रीय गायनाने राजर्षी शाहू संगीत रजनीची सांगता होणार आहे.

या सर्व कार्यक्रमांना आशय कुलकर्णी (तबला), शुभम खंडाळकर (गायन), ज्ञानेश्वर अंडील (पखवाज आणि पढंत), यशवंत थिटे (हार्मोनियम), प्रदीप कुलकर्णी(तबला), गिरीधर कुलकर्णी (तबला), महेश देसाई (तबला), सारंग कुलकर्णी (हार्मोनियम) व स्वरुप दिवाण (हार्मोनियम) यांची साथसंगत लाभणार आहे. रसिकांनी आवर्जून उपस्थित राहून संगीत रजनीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.

0 9 FEB 2026

पुण्यनगरी

# कुलगुरुपदासाठी आजपासून अर्ज छाननी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या रिक्त कुलगुरुपदासाठी सोमवारपासून अर्ज छाननी प्रक्रिया सुरू होणार आहे. या पदासाठी राज्यभरातून ११५ अर्ज आलेले असून, त्यामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अनेक नामांकित व्यक्तींचा समावेश आहे. ही छाननी सोमवार आणि मंगळवार या दोन दिवशी चालणार असून, त्यानंतर पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शर्के यांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी पूर्ण झाला. त्यानंतर पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे कुलगुरुपदाचा प्रभारी कार्यभार सोपवण्यात आला, तर दि. २३ डिसेंबर ते २७ जानेवारी या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी अर्ज मागवण्यात आले.



शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी एकूण ११५ अर्ज आले आहेत. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठामध्ये सध्या विविध पदांवर कार्यरत असणाऱ्या अनेक नामांकित व्यक्तींचा समावेश आहे. या सर्वच अर्जांची छाननी दोन दिवसांत केली जाणार आहे. त्यांच्यातून पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. त्यानंतर या नावांवर हरकती आणि पात्र उमेदवारांच्या मुलाखत पार पडतील. यामधून निवड झालेल्या पाच व्यक्तींपैकी एका व्यक्तीची कुलगुरुपदावर नियुक्ती करण्यात येईल.

जनसंपर्क कक्ष
0 9 FEB 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हाप

# राजर्षी शाहू संगीत रजनी उद्यापासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित करण्यात येणारी राजर्षी शाहू संगीत रजनी दि. १० व ११ फेब्रुवारी रोजी पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहामध्ये होत आहे. दि. २८ जानेवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाल्यामुळे २९ व ३० जानेवारी रोजी आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनी स्थगित करण्यात आली होती.

ही दोनदिवसीय संगीत रजनी दररोज संध्याकाळी ५.३० वाजता सुरू होईल. संगीत रजनीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार असून, या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. संगीत रजनीमध्ये पहिल्या दिवशी पहिल्या सत्रामध्ये मौशमी जाजू, पुणे यांचे कथ्थक नृत्य होणार आहे, तर दुसऱ्या सत्रामध्ये अतुल खांडेकर, पुणे यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात डॉ. सुधांशू कुलकर्णी व सारंग कुलकर्णी, बेळगाव यांच्या हार्मोनियम (संवादिनी) वादनाची जुगलबंदी होणार आहे, तर, दुसऱ्या सत्रामध्ये पं. विजय कोपरकर, पुणे यांच्या शास्त्रीय गायनाने राजर्षी शाहू संगीत रजनीची सांगता होणार आहे.



या सर्व कार्यक्रमांना आशय कुलकर्णी (तबला), शुभम खंडाळकर (गायन), ज्ञानेश्वर अंडील (पखवाज आणि पढंत), यशवंत थिटे (हार्मोनियम), प्रदीप कुलकर्णी (तबला), गिरीधर कुलकर्णी (तबला), महेश देसाई (तबला), सारंग कुलकर्णी (हार्मोनियम) व स्वरूप दिवाण (हार्मोनियम) यांची साथसंगत लाभणार आहे. रसिकांनी आवर्जून उपस्थित राहून संगीत रजनीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.

0 9 FEB 2026
सकाळ

# उद्यापासून रंगणार राजर्षी शाहू संगीत रजनी

## संगीत-नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे घेतली जाणारी 'राजर्षी शाहू संगीत रजनी' मंगळवारी (ता. १०) आणि बुधवारी (ता. ११) पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहामध्ये होणार आहे.

विद्यापीठाने २९ आणि ३० जानेवारी रोजी ही संगीत रजनी घेण्याचे नियोजन केले होते. मात्र, २८ जानेवारी रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने ही संगीत रजनी स्थगित करण्यात आली. ही दोन दिवसीय संगीत रजनी रोज सायंकाळी साडेपाच वाजता सुरू होईल. संगीत रजनीचे उद्घाटन प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार आहे. पहिल्या दिवशी पहिल्या सत्रामध्ये मौशमी जाजू (पुणे) यांचे कथ्थक नृत्य आणि दुसऱ्या सत्रामध्ये अतुल खांडेकर (पुणे) यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात डॉ. सुधांशु कुलकर्णी आणि सारंग कुलकर्णी (बेळगाव) यांच्या हार्मोनियम (संवादिनी) वादनाची जुगलबंदी होईल. दुसऱ्या सत्रामध्ये पंडित विजय कोपरकर (पुणे) यांच्या शास्त्रीय गायनाने राजर्षी शाहू संगीत रजनीचा समारोप होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना आशय कुलकर्णी, शुभम खंडाळकर, ज्ञानेश्वर अंडील, यशवंत थिटे, प्रदीप कुलकर्णी, गिरीधर कुलकर्णी, महेश देसाई, सारंग कुलकर्णी, स्वरूप दिवाण यांची साथसंगत लाभणार आहे. रसिकांनी या संगीत रजनीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.

09 FEB 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठातर्फे उद्यापासून शाहू संगीत रजनी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे उद्या, मंगळवारपासून दोन दिवस राम गणेश गडकरी सभागृहात राजर्षी शाहू संगीत रजनी होत आहे. सायंकाळी साडेपाच वाजता प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते उद्घाटन होईल. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. पहिल्या दिवशी पहिल्या सत्रात मौशमी जाजू यांचे कथ्थक नृत्य, दुसऱ्या सत्रात अतुल खांडेकर यांचे शास्त्रीय गायन होईल. दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात डॉ. सुधांशू कुलकर्णी व सारंग कुलकर्णी यांच्या हार्मोनियम (संवादिनी) वादनाची जुगलबंदी होईल. दुसऱ्या सत्रात पंडित विजय कोपरकर यांच्या शास्त्रीय गायनाने सांगता होईल. रसिकांनी संगीत रजनीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.

0 9 FEB 2026
लोकमत

# कुलगुरूपदासाठी आलेल्या अर्जांची आज, उद्या छाननी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी राज्यभरातून ११५ पात्रताधारकांनी अर्ज केले आहेत. यात शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह १६ जणांचा समावेश आहे. या अर्जांची छाननी आज, सोमवारी आणि उद्या, मंगळवारी अशी दोन दिवस होणार आहे. त्यानंतर पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पाच वर्षांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण झाला. त्यांचा कार्यकाल संपण्यापूर्वी नूतन कुलगुरूची निवड होणे अपेक्षित होते. परंतु त्यानंतर पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा प्रभारी कार्यभार सोपविला आहे.

कुलपती कार्यालयाने नूतन

## दोन दिवस छाननी

**सोमवार व मंगळवार : अर्जांची छाननी**

**पात्र उमेदवारांची कच्ची यादी**

हरकती मागविणे

**हरकतींचे निरसन करून, पक्की यादी जाहीर करणे**

निवड समितीकडून मुलाखतीची प्रक्रिया

**पाच उमेदवारांची नावे अंतिम करणे**

यामधून एकाची कुलगुरू म्हणून निवड

कुलगुरूपदासाठी २३ डिसेंबर ते २७ जानेवारी या कालावधीत अर्ज मागविले होते. कोईम्बतूर भारतीय विद्यापीठाचे गणित विभागाचे प्रा. एस. सरवनन नोडल ऑफिसर आहेत. अर्ज प्रक्रियेला दोन दिवसांची मुदतवाढ दिली होती. या पदासाठी डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. निशा मुडे, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. एस. व्ही. कोळेकर यांनीही अर्ज केलेले आहेत.